# जाहिरात

## जिल्हा शल्यचिकित्क, जिल्हा रुग्णालय, भंडारा .

### वॉक इन इंटरव्ह्युद्वारे तदर्थ वैद्यकिय अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने पदे भरण्याबाबत थेट मुलाखात.

मा.जिल्हाधिकारी भंडारा यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यांत आलेल्या आरोग्य सेवा भंडारा या जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केन्द्र, ग्रामीण रुग्णालय, सामान्य रुग्णालयातील महाराष्ट्र आरोग्य सेवा (गट-अ) यांची रिक्त पदे तदर्थ वैद्यकिय अधिकारी म्हणुन **कंत्राटी पध्दतीने रिक्त ११ महिन्याचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन भरावयाची आहेत**.

१) सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती ११ महिन्यासाठी किंवा पदावर नियमित वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील.

२) सदर कंत्राटी नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने त्यांना सदर पदावर भविष्यात कायम करण्यांत येणार नाही व त्या पदावर त्यांचा धारणाधिकार असणार नाही.

३) सदर कंत्राटी वेद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना नियमित वैद्यकिय अधिकाऱ्यासारखे म.ना.से.निवृत्तीवेतन म.ना.से.(रजा)नियम लागू राहणार नाहीत तसेच ते विमा योजना,भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतेही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत. त्यांना वार्षीक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाहीत.

४) कंत्राटी तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची भविष्यात विहीत मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्यांच्या नियमित सेवेस जोडुन दिली जाणार नाही.

५) केवळ तात्पुरती कंत्राटी नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची कंत्राटी सेवा अर्हताकारी सेवा म्हणुन गणण्यात येणार नाही किवा सेवा जेष्ठता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवाविषयक बाबीसाठी ग्राहय धरली जाणार नाही.

६) सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांनी सेवेत असताना गैरवर्तन/गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यांत येणार नाही.

७) सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना सेवाकाळात सेवामुक्त व्हावयाचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक महिण्याचे मानधन भरुन कार्यमुक्त होता येईल.

८) वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत १००/- चे स्टॅम्पपेपर करारनामा करण्यांत येईल.

सदरहु तदर्थ वैद्यकिय अधिकारी यांची **कंत्राटी पदे भरण्यासाठी दिनांक ०५.०१.२०१९ पर्यत अर्ज मागविण्यांत येत असुन (शासकिय सुटीचे दिवस वगळुन) दिनांक १४.०१.२०१९ रोजी दुपारी १.०० ते ५.०० वाजेपर्यत पात्र उमेदवाराची मुलाखात जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा येथे आयोजित करण्यांत येत आहे.**

करीता उमेदवारांनी दिनांक ०५.०१.१९ चे ५.०० वाजेपर्यत अर्जासह एमबीबीएस व विशेषज्ञ पदासाठी पदव्युत्तर पदवी/पदविका यांचे सर्व वर्षाचे गुणपत्रिका,पदविका/पदवी प्रमाणपत्र, वैद्यकिय परिषदेचे नोदणी प्रमाणपत्र, वयाचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, अलीकडील पासपोर्ट साईजचा फोटो व इतर आवश्यक प्रमाणपत्राची छायांकित प्रत जिल्हा रुग्णालय, भंडारा येथील कार्यालयास सादर करावे. व मुलाखती वेळी मुळ प्रेमाणपत्र सोबत घेवुन येणे आवश्यक आहे.

उमेदवाराचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच अनधिकृत गैरहजर असलेल्या/संपामध्ये सहभागी असलेले/शासन सेवेत शिस्तभंग कार्यवाहीकरीता काढुन टाकलेले वैद्यकिय अधिकारी यांना अर्ज करता येणार नाही.

| | | |
|---|---|---|
| अर्ज सादर करण्याचा शेवट चा दिनांक | ०५.०१.२०१९. | जिल्हा रुग्णालय, कार्यालय भंडारा |
| मुलाखतीचा दिनांक | १४.०१.२०१९ | जिल्हाधिकारी कार्यालय,भंडारा |

| वैद्यकिय अधिकाऱ्यांची अर्हता | मानधन |
|---|---|
| एमबीबीएस | रु.४०,०००/- |
| विशेषज्ञ | रु.५०,०००/- |

स्वाक्षरी
सदस्य सचिव, तथा जिल्हा शल्यचिकित्सक,
जिल्हा रुग्णालय, भंडारा.

स्वाक्षरी
अध्यक्ष, जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी, भंडारा